विक्रीकर विभागातील कर सहायक, गट-२०१६
दि २८ ऑगस्ट, २०१६

# A

2016

CODE : AO8

प्रश्नपुस्तिका क्रमांक
प्रश्नपुस्तिका BOOKLET NO.

मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, बुद्धिमत्ता चाचणी, मूलभूत गणितीय कौशल्य आणि पुस्तपालन व लेखाकर्म

वेळ : 2 ( दोन ) तास

एकूण प्रश्न : 200
एकूण गुण : 400

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 200 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

परीक्षा-क्रमांक [ | | | | | | | ]
केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरापैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**
**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या शेवटच्या पृष्ठावर पहा**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

1. "तू जो कुडता मला दिला होतास, तो मी घातला आहे." - यातील गौण व मुख्य वाक्यांचे परस्पर रूपांतर केल्यास पुढीलपैकी कोणता पर्याय मिळेल?

(1) मी घातलेला कुडता, तू दिलेला आहेस.

(2) तू दिलेला कुडता मी घातला आहे.

(3) मी जो कुडता घातला आहे, तो तू मला दिला होतास.

(4) मी घातला आहे तो कुडता तू दिला आहेस.

---

2. 'सुवाच्य' याचा विरुद्धार्थी शब्द पुढीलपैकी कोणता नाही?

(1) गिचमिड (2) दुर्बोध (3) अवाचनीय (4) अर्वाच्य

---

3. 'ज्याच्या हाती ससा तो पारधी' - यामध्ये आलेली सर्वनामे कोणत्या प्रकारची आहेत?

(1) सामान्य (2) संबंधी व दर्शक (3) पुरुषवाचक व दर्शक (4) संबंधी व सामान्य

---

4. "वक्त्याच्या भाषणात तर्कसंगती आणि संदर्भ यांचा अभाव होता. मात्र अतिशय आवेशपूर्ण असे त्यांचे भाषण झाले. अध्यक्षांनी समारोप करताना 'यांच्या विद्वत्तेची मी काय पावती देणार?' असे उद्गार काढले."

यामधून त्यांनी काय सुचवले?

(1) वक्ते अतिशय विद्वान आहेत.

(2) त्यांच्या विद्वत्तेचे मोजमाप करणे कठीण आहे.

(3) भाषणातून विद्वत्तेचा अभाव श्रोत्यांना कळलाच आहे.

(4) मूल्यमापन करण्यास अध्यक्ष पात्र नाहीत.

---

5. 'भुंगा' या शब्दाला समानार्थी शब्द खालील पर्यायातून ओळखा.

(1) वसन (2) अरी (3) अली (4) तनुज

---

6. 'ऐकणे' या क्रियापदापासून कर्तृवाचक विशेषण घडवण्यासाठी कोणता प्रत्यय जोडावा लागेल?

(1) ऊ (2) रा (3) आ (4) णारा

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

7. 'विधिनिषेध नसणे' या वाक्प्रचाराचा अर्थ -

(1) काय करावे, काय करू नये याचा अजिबात विचार नसणे.

(2) कायद्याने प्रतिबंध नसणे.

(3) एखाद्या विधीस आडकाठी नसणे.

(4) कायद्यास प्रतिबंध नसणे.

---

8. सेलची जाहिरात वाचून हौसेने खरेदीला गेलेल्या रमाबाईंच्या गळ्यातली किमती माळ गर्दीत चोरीला गेली. बहिणीने विचारले - 'केवढ्याला झाली ही खरेदी ______'

- या वाक्यानंतर रिकाम्या जागी कोणते विरामचिन्ह येऊ शकते ?

(1) पूर्णविराम वा प्रश्नचिन्ह (2) प्रश्नचिन्ह वा उद्‌गारवाचक चिन्ह

(3) स्वल्पविराम वा पूर्णविराम (4) पूर्णविराम वा उद्‌गारवाचक चिन्ह

---

9. 'तुणतुणे वाजविणे' हा वाक्प्रचार पुढीलपैकी कोणत्या संदर्भात उपयोगात आणला जातो ?

(1) एखादी व्यक्ती महत्त्वाच्या कामात साथ करीत असेल तेव्हा

(2) एखादी व्यक्ती आपली आवडती गोष्ट श्रोते कंटाळले तरी वारंवार सांगत असेल तेव्हा

(3) एखादी गोष्ट जशीच्या तशी पुनरावृत्त होत असेल, त्यावेळी

(4) मोठ्या कामात आपला सहभाग असेल तेव्हा

---

10. 'आधणातले रडतात आणि सुपातले हसतात.' - म्हणजे काय ?

(1) प्रत्येकासोबत ज्याचे त्याचे दैव असते.

(2) आज सुखात आहेत, ते उद्या दु:खात पडणार हा सृष्टिनियम आहे.

(3) ओल्याबरोबर सुकेही जळते.

(4) हसणे रडणे प्रत्येकाच्या स्थितीवर अवलंबून असते.

---

11. 'उधारीचे पोते सवा हात रिते', ही म्हण काय सुचवते ?

(1) उधारी अंतिमत: नुकसानीत नेते.

(2) उधारीने भरपूर गोष्टी घेता येतात.

(3) उधारीची खरेदी ऐपत नसली तरी होऊ शकते.

(4) उधारीने मिळेल तेव्हा घ्यावे तेवढे थोडेच.

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

12. 'सूज्ञास अधिक सांगणे न लगे.' - या विधानातील क्रियापदाचा प्रकार ओळखा.

(1) अनियमित (2) शक्य (3) प्रयोजक (4) भावकर्तृक क्रियापद

13. शुद्ध शब्द कोणता ?

(1) औद्योगीकरण (2) उद्योगिकरण (3) औद्योगिकरण (4) उद्योगीकरण

14. 'टिटवी देखील समुद्र आटवते.' - या म्हणीच्या विरुद्ध आशय सुचवणारी म्हण पुढीलपैकी कोणती ?

(1) थेंबे थेंबे तळे साचे (2) भित्यापाठी ब्रह्मराक्षस

(3) सरड्याची धाव कुंपणापर्यंत , (4) कोठे इंद्राचा ऐरावत कोठे श्यामभटाची तट्टाणी

15. पुढीलपैकी कोणत्या गटातील शब्द समानार्थी आहेत ?

(1) गिरी, पर्वत, नग (2) डोंगर, नभ, खग (3) नग, शिखर, खग (4) नभ, अद्रि, खग

16. ''वसंतरावांनी बँकेतली सगळी ठेव काढून दामदुपटीपेक्षा जास्तीची आश्वासने देणाऱ्या नव्या कंपनीत गुंतवली. पुढे ती कंपनीच बोगस निघाली आणि वसंतरावांचे होते नव्हते ते गेले. म्हणतात ना __________!''

– रिकाम्या जागी कोणती म्हण वापरता येईल ?

(1) असंगाशी संग आणि प्राणाशी गाठ (2) आधी बुद्धी जाते मग लक्ष्मी जाते

(3) जगी सर्वसुखी असा कोण आहे ? (4) धर्म करता कर्म उभे राहते

17. 'जनतेने त्यांना तिसऱ्यांदा निवडून दिले.' - या वाक्यातील प्रयोग ओळखा.

(1) कर्तरी (2) कर्मणी (3) भावे (4) कर्तृ-कर्म संकर

18. ''तुम्ही म्हणालात तर आम्ही देखील नाटकाला येऊ.'' - या वाक्यामध्ये कोणते अव्यय आले आहे ?

(1) क्रियाविशेषण अव्यय (2) साधित शब्दयोगी अव्यय

(3) शुद्ध शब्दयोगी अव्यय (4) केवलप्रयोगी अव्यय

19. 'ग्रह' या शब्दास पुढीलपैकी कोणकोणते अर्थ आहेत ?

(1) स्वीकार, सूर्यमालेतील गोल, समजूत (2) घर, स्वीकार, समजूत

(3) इमारत, समजूत, पृथ्वी (4) घर, सूर्यमालेतील गोल, स्वीकार

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

20. ''निदान कामाच्या पहिल्या दिवशी तो लवकर यावा.'' - हे कोणत्या प्रकारातील वाक्य आहे ?

(1) आज्ञार्थी (2) विध्यर्थी (3) उद्‌गारार्थी (4) संकेतार्थी

---

21. 'अर्धामुर्धा' हा शब्द पुढीलपैकी कोणत्या प्रकारातील आहे ?

(1) पूर्णाभ्यस्त (2) अंशाभ्यस्त (3) अनुकरणवाचक (4) सामासिक

---

22. ''तो मोठा मतलबी मनुष्य आहे. त्याच्या _________ हे चांगले!''

- रिकाम्या जागी पुढीलपैकी कोणता वाक्प्रचार योग्य ठरेल ?

(1) वाऱ्यावर सोडणे (2) वाटेस जाणे

(3) वाऱ्यास उभे न राहणे (4) वाटेस लावणे

---

23. 'उदार' या विशेषणापासून भाववाचक नाम घडविण्यासाठी कोणते प्रत्यय उपयोगात येतात ?

(1) य, ता (2) ई, त्व (3) ई, पणा (4) य, ई

---

24. 'दशभुजा' हा कोणत्या प्रकारचा समास आहे ?

(1) द्वंद्व (2) कर्मधारय (3) तत्पुरुष (4) बहुव्रीही

---

25. ''साने गुरुजी अतिशय संवेदनशील होते.'' – या वाक्याचे उद्‌गारार्थी वाक्यात रूपांतर पुढीलपैकी कोणते असेल ?

(1) किती संवेदनशील होते साने गुरुजी ! (2) साने गुरुजी खूपच संवेदनशील होते !

(3) साने गुरुजी अतिशय संवेदनशील होते ना ? (4) साने गुरुजी किती संवेदनशील होते ?

---

26. खालील म्हणीचा योग्य अर्थ सांगा.

'उथळ पाण्याला खळखळाट फार.'

(1) मूळातच काही नाही मग नसत्या उठाठेवी कशाला.

(2) अगदी छोटीसी धार पण धबधब्यासारखा आवाज.

(3) ज्या माणसाजवळ विद्वत्ता बेताचीच असते तो खूप बढाया मारतो.

(4) मूळातच पाण्याचा थेंब नाही तेथे पाण्याचा आवाज कोठून येणार ?

---

27. ''आर्थिक वाढ पाच टक्क्यांवरून आठ टक्क्यांवर नेण्यासंबंधी रघुराम राजन यांचे मत प्रतिकूल होते.''
- या वाक्याचे नकारार्थी वाक्यात रूपांतर करताना पुढीलपैकी कोणता पर्याय उपयोगात आणता येईल ?
(1) विरोधी (2) वेगळे (3) अनुकूल (4) भिन्न

28. 'पळणाऱ्यास एक वाट, शोधणाऱ्यास बारा वाटा' या म्हणीतून काय व्यक्त होते ?
(1) पळणाऱ्याच्या मर्यादा (2) चोरवाटेच्या मर्यादा
(3) शोधणाऱ्याचे सामर्थ्य (4) चोरीची सुलभता व शोधाची कठीणता

29. ''समारंभास नागरिक (मोठी संख्या) ने उपस्थित होते.'' - कंसातील शब्दांचे कोणते रूप येथे योग्य ठरेल ?
(1) मोठ्या संखे (2) मोठ्या संख्या (3) मोठी संख्या (4) मोठ्या संख्ये

30. पर्यायी उत्तरांतील 'नकारार्थी वाक्य' ओळखा.
(1) एकादशीची गर्दी फार मोठी असते (2) एकादशीची गर्दी ही लहानसहान नव्हे
(3) एकादशीची गर्दी केवढी आहे ही (4) एकादशीची केवढी आहे नाही गर्दी

31. ''सातपुडा परिसरात होळीच्या आठ दिवस आधी भोंगऱ्या बाजार भरतो.'' - या वाक्यातील उद्देश्य कोणते ?
(1) सातपुडा परिसर (2) होळी
(3) होळीच्या आठ दिवस आधी (4) भोंगऱ्या बाजार

32. 'तपोधाम' ही संधी पुढीलपैकी कोणत्या प्रकारे सोडवता येईल ?
(1) तप + धाम (2) तपः + धाम (3) तपो + धाम (4) तप + उधाम

33. पुढीलपैकी कोणत्या शब्दास विविध अर्थ नाहीत ?
(1) अर्थ (2) अर्क (3) अर्ध (4) अलंकार

34. ''माधुरी पुरंदरे यांनी शालेय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे पुस्तक लिहिले आहे.'' - अधोरेखित शब्द पुढीलपैकी कोणत्या स्वरूपाचे आहेत ?
(1) उद्देश्य (2) उद्देश्य विस्तार (3) कर्मपूरक विस्तार (4) विधेय विस्तार

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

35. पुढीलपैकी कोणत्या वाक्यामध्ये प्रयोजक क्रियापद आहे ?
   (1) मला अजिबात पहाटे लवकर उठवत नाही.
   (2) संतांना लोकांचे दु:ख पाहवत नव्हते.
   (3) ज्ञानेश्वरांनी भिंत चालवली, अशी आख्यायिका आहे.
   (4) दिवसभर लोकांच्या प्रश्नांची उत्तरे देऊन देऊन शेवटी त्याला बोलवेना.

---

**खालील उतारा वाचून त्यापुढे दिलेल्या प्रश्न संख्या 36 ते 40 ची उत्तरे लिहा.**

एखादं व्याख्यान म्हणा, प्रवचन म्हणा - फक्त ऐकलं, म्हणजे फक्त श्रवणभक्ती केली, तर ऐकताना काहीतरी समजल्यासारखं वाटतं. व्याख्यान फारच प्रभावी असेल तर आपण अगदी भारावून जातो. पण कसोटीच्या वेळी त्यातलं फारसं काही स्मरत नाही. अर्थात हे सारं क्षुल्लक चकाट्यांच्या संदर्भात नसून ज्ञानलक्ष्यी विवेचनाच्या संदर्भात घ्यायचं आहे. आपण स्वत: पुस्तकं वाचली, टिप्पणी तयार केली तर बरचं सखोल ज्ञान होतं पण स्वत: प्रयोग करून पाहिले तर मात्र ज्ञान पक्कं होतं. विज्ञान शिक्षणाच्या बाबतीत आपण हे अनेक वेळा ऐकतो आणि ते खरंही आहे.

पण याचा पुढचा भाग अधिक महत्त्वाचा आहे. दुसऱ्या कुणीतरी प्रयोगाचं साहित्य जमवून टेबलावर मांडून ठेवलं असेल, प्रयोग कसा करायचा वगैरे सर्व ठरवलं असेल तर प्रयोग करून थोडं फार कौशल्य येतं यात शंका नाही. पण विज्ञानाचं खरं मर्म समजून घ्यायचं असेल तर संपूर्ण प्रयोगाचं नियोजन आपण केलं पाहिजे. प्रयोग कशासाठी करायचा आहे, त्यासाठी किती सामुग्री लागेल, कोणती उपकरणं लागतील, त्यातलं एखादं उपलब्ध नसेल तर दुसरं कोणतं वापरता येईल, प्रयोग यशस्वी झाल्याच्या खुणा कोणत्या, 'अयशस्वी' म्हणजे काय वगैरे प्रश्नांची उत्तरं आपल्याला ठाऊक पाहिजेत. या प्रश्नांची उत्तरं शोधणं यातच अनेकदा प्रयोगाचं रहस्य दडलेलं असतं. वरकरणी अयशस्वी ठरलेल्या कित्येक प्रयोगांनी विज्ञानाची नवी क्षेत्रं खुली केली आहेत. प्रयोगाचं मर्म समजू लागलं की 'अयशस्वी' आणि 'अनपेक्षित' यातला फरक ओळखता येऊ लागतो. योजकता वाढीस लागते. पण बहुधा अशी संधी फारशी कोणाला मिळत नाही. वाट्याला येतो तो फक्त प्रयोगशाळेत कवायत करण्याचा तास. अशी कवायत करून प्रयोग-विज्ञानाचा संस्कार घडत नसतो.

हे सारं विज्ञानाच्या विद्यार्थ्यांसाठीच असतं, इतरांना त्याचा स्पर्श झाला नाही तरी चालेल - हा एक फार मोठा गैरसमज. 'विज्ञान' ही व्यावसायिक वैज्ञानिकांची मिरास नव्हे. ज्यात विज्ञानाचा फारसा काही संबंध नाही असं वाटत होतं अशा ज्ञानशाखांखालून अस्सल विज्ञानाचा केवढा मनगटाएवढा झरा वाहत आहे याची कल्पना आता येऊ लागली आहे. विज्ञान सर्वत्र आहे. त्याचे संस्कार सर्वांवर व्हायला हवेत. तरच आगामी शतक सुखाचं जाईल.

दुसरा गैरसमज असा की, विज्ञानाचे संस्कार विद्यार्थी शाळेत किंवा कॉलेजात गेल्यावर घडतील. 'विभास किती लहान आहे, पद्मजा तर परकरी पोर आहे' या वृत्तीमुळेच कर्तबगारीची बीजं कुजवली जातात. नियोजनाचे संस्कार लहानपणापासून घडवता येतात. घडवावे लागतात म्हणूनच लहान मुलांना बाजारहाट करताना बरोबर घेऊन जाणं, प्रवासात सामान किती घ्यावं, बॅग कशी भरावी याचं नियोजन करू द्यावं. पिशवीत बटाटे किंवा सुरण खाली घालून टोमॅटो अगदी वर ठेवावे ही समजूत आपण समजतो तितकी सामान्य नाही.

---

36. प्रयोगाचे रहस्य अनेकदा कशात दडलेले असते ?
   (1) प्रयोगाची उद्दिष्ट्ये माहीत असण्यात.
   (2) सामुग्री कशासाठी वापरायची आहे, याच्या माहितीत.
   (3) यशापयशाच्या खुणा माहीत असण्यात.
   (4) सर्व संबंधित प्रश्नांच्या उत्तरांच्या शोधात.

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

37. प्रस्तुत उताऱ्यास कोणते शीर्षक योग्य ठरेल ?

(1) प्रयोगाचे महत्त्व (2) स्वावलंबनाचे महत्त्व

(3) नियोजनाचे संस्कार (4) विज्ञानाचे संस्कार

38. स्वत: प्रयोग करून पाहिल्याने ज्ञान पक्के होते, हे केव्हा खरे ठरते ?

(1) प्रयोगशाळेत आपण स्वत: प्रयोग केल्यावर (2) नियोजन व तयारीसह सर्व प्रयोग आपण केल्यावर

(3) प्रयोगाचा चांगला सराव केल्यावर (4) पुस्तके वाचून प्रयोग केल्यावर

39. लेखक येथे कोणता विचार मांडत आहेत ?

(1) विज्ञानाचे क्षेत्र स्वतंत्र आहे.

(2) काही ज्ञानशाखांचा विज्ञानाशी संबंध नसतो.

(3) वैज्ञानिक तत्त्वे सर्व ज्ञानशाखांमध्ये आहेत.

(4) विज्ञानाच्या संस्कारातून व्यावसायिक वैज्ञानिक निर्माण होतील.

40. वरकरणी अयशस्वी ठरलेल्या प्रयोगांनी विज्ञानाचा विकास कसा होतो ?

(1) अनपेक्षित गोष्टी पुढे येत असल्यामुळे. (2) अपयश हीच यशाची पहिली पायरी असल्यामुळे.

(3) प्रयोगकर्त्याला सराव झाल्यामुळे. (4) चुका दुरुस्त करता येत असल्यामुळे.

41. Convert the sentence into indirect speech :

**The prince said, "It gives me great pleasure to be here this evening."**

(1) The prince says, that it gives him great pleasure to be here that evening.

(2) The prince said that it gave him great pleasure to be there that evening.

(3) The prince said, that it gave him great pleasure to be there that evening.

(4) The prince said that it gives him great pleasure to be there that evening.

42. Fill in the blank with the answer options given below :

**Either the children or the milkman _________ knocking at the door.**

(1) are (2) is (3) were (4) have

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

43. Give the synonym of :

**conceit**

(a) bright (b) pride (c) vanity (d) scholar

**Answer options :**

(1) (a) and (b) (2) (b) and (c) (3) (a) and (d) (4) (b) and (d)

---

44. What does the following idiom mean ?

**to bury the hatchet**

(1) to give up old enmity (2) to hide one's wealth

(3) to hide one's dislike (4) to kill someone

---

45. Choose the **correct** sentence.

(a) We entered the house.

(b) I ordered coffee.

(c) What is the time by your watch ?

**Answer options :**

(1) Only (b) (2) Only (a) and (b)

(3) Only (a) and (c) (4) Only (b) and (c)

---

46. Punctuate the following sentence :

**Yogesh cried his wife how stupid of you to have resigned**

(1) Yogesh cried his wife, "How stupid of you to have resigned !"

(2) Yogesh cried his wife, "How stupid of you to have resigned ?"

(3) "Yogesh," cried his wife, "how stupid of you to have resigned !"

(4) "Yogesh", cried his wife, "how stupid of you to have resigned !"

---

47. Match the following words with their antonyms :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Amateur | (i) | constant |
| (b) | Fickle | (ii) | liberal |
| (c) | Chaos | (iii) | professional |
| (d) | Orthodox | (iv) | order |

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (3) | (iv) | (i) | (ii) | (iii) |
| (4) | (ii) | (iii) | (i) | (iv) |

48. Identify the sentence which is not in passive voice.

(a) Her grief has been forgotten by her.

(b) Our neighbour has bought a Nano car.

(c) My guilt has been discovered.

**Answer options :**

(1) Only (a)  (2) Only (b)

(3) Only (b) and (c)  (4) Only (a) and (c)

49. Choose the most appropriate antonym for the underlined word :

**Our teacher was a very <u>strict</u> person.**

(1) lenient  (2) relaxed  (3) kind  (4) humorous

50. Spot the sentence with the correct use of punctuation signs.

(a) I saw the ladies were very tired and hungry; I offered them some of the food; that we had stored away in case of an emergency.

(b) As I saw the ladies were very tired and hungry, I offered them some of the food that we had stored away in case of an emergency.

**Answer options :**

(1) Only (a)  (2) Only (b)

(3) Both (a) and (b)  (4) Neither of them

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

**51.** Choose the grammatically **correct** sentence.

(a) The village counsel was a very effective body in the past.

(b) The defense counsel wanted to cross examine the witness.

**Answer options :**

(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither

---

**52.** Change into Exclamatory sentence.

**These are lovely apples.**

(1) How lovely these apples are ! (2) What lovely these apples are !

(3) How lovely are these apples ! (4) What lovely are these apples !

---

**53.** Select the one that best conveys the meaning of the sentence/phrase :

**Absolute rule by one person.**

(1) plutocracy (2) autocracy (3) hippocracy (4) monopoly

---

**54.** Choose the best among the options to fill in the blank :

**He _________ better mind his manners.**

(1) had (2) should (3) has (4) can

---

**55.** What does the following idiom mean ?

**to run the gauntlet**

(1) to participate in a contest (2) to sell gloves

(3) to face criticism (4) to indulge in trade

---

**56.** Choose the **correct** meaning of the expression.

**A white Elephant.**

(1) An unusual event (2) A beautiful object

(3) A possession that is burden some (4) An elephant which is white in colour

---

**57.** Select the **correct** sentence.

(a) Everyone warned you, didn't they ?

(b) I'm living in London. Are you ?

**Answer options :**

(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither

---

58. Identify the sentences which are in the active voice.

(a) The guard refused him admittance.

(b) She was handed a chair.

(c) We are taught grammar by Mr. Krishnaji.

**Answer options :**

(1) (a) only (2) (b) only

(3) Only (a) and (b) (4) None of these

---

59. Choose the option with all four words spelt correctly.

(1) Lightening, noticeable, vacuum, ocassional.

(2) Lightning, noticeable, vacuum, occasional.

(3) Lightening, noticable, vaccum, ocassional.

(4) Lightning, noticeable, vaccum, ocassional.

---

60. Select the **incorrect** sentence.

(a) If you met him, he might guide you.

(b) If you have studied hard, you would have got good marks.

(c) If she works regularly, she could achieve her goal.

**Answer options :**

(1) Only (a) (2) Only (b)

(3) Only (b) and (c) (4) Only (a) and (c)

---

61. Fill in the blank with the most appropriate among the given options :

**His ________ makes him a bad negotiator.**

(1) adamancy (2) adamance (3) adamantness (4) adamansion

---

62. Choose the correctly spelt word.

(1) PERIMETRE (2) PERIMETER (3) PEREMETRE (4) PERAMETER

---

63. Rewrite the sentence using 'No Sooner ............. than'

As soon as he hears the news, he will write to me.

(1) No sooner does he hear the news than he will write to me.

(2) No sooner he hears the news than he will write to me.

(3) No sooner does he hear the news then he will write to me.

(4) No sooner does he hears the news than he will write to me.

---

64. Find out which are the **correct** sentences.

(a) These kind of books do not appeal to me.

(b) Those kinds of books do not appeal to me.

(c) These kinds of books do not appeal to me.

(d) This kind of book does not appeal to me.

**Answer options :**

(1) Only (a) (2) Only (b)

(3) Both (a) and (b) (4) (b), (c) and (d)

---

65. Identify the structure of the sentence :

**Being hard-working is not enough.**

(1) Simple (2) Complex

(3) Compound (4) Compound-Complex

---

66. Choose the **correct** indirect narration of the sentence given below :

**He said, "Let's leave the case at the station."**

(a) He suggested leaving the case at the station.

(b) He suggested that they shall leave the case at the station.

(c) He suggested that we should leave the case at the station.

**Answer options :**

(1) Only (a) (2) Only (b)

(3) Only (a) and (c) (4) Only (b) and (c)

---

67. Rajaji did not see eye to eye with Mr. Nehru on some points.

(1) challenge (2) dispute (3) agree (4) accept

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

68. With which of the given options do the underlined words most closely rhyme ?

**He is a good cricketer. He bowls quite fast.**

**Keep the bowls next to the plates.**

(1) howls and holes
(2) holes and howls
(3) both rhyme with holes
(4) both rhyme with howls

69. Spot the **incorrect** sentence where misrelated participle has been used.

(a) After waiting in the queue for ten minutes the bus arrived completely full.

(b) After we had been waiting in the queue for ten minutes the bus arrived completely full.

**Answer options :**

(1) Only (a)
(2) Only (b)
(3) Both (a) and (b)
(4) Neither (a) nor (b)

70. Identify the Mood :

**"Speak"**

(1) Indicative
(2) Subjunctive
(3) Imperative
(4) None of the above

71. Choose the **incorrect** sentence.

(a) I woke up; I got out of bed.

(b) He says; laws die, books never.

(c) O God, Help me.

**Answer options :**

(1) Only (a)
(2) Only (b)
(3) Only (a) and (c)
(4) None of the three

72. Identify the option closest in meaning to the sentence given below :

**I request that the meeting should be postponed.**

(1) I request to postpone the meeting.
(2) I request postponement of the meeting.
(3) I requested to postpone the meeting.
(4) I requested postponement of the meeting.

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

73. Which of the given options comes nearest in meaning to the underlined word ?
**This is an intractable problem.**
(1) impossible to locate (2) impossible to understand
(3) impossible to resolve (4) impossible to track

74. Select the word that is most nearly opposite in meaning to the word given.
**Incessantly**
(1) Frequently (2) Periodically (3) Regularly (4) Submissive

75. Choose the most appropriate phrase :
**He is on good terms with the boss, hence he manages to _________ with all kinds of indiscipline.**
(1) get along (2) get out (3) get away (4) get over

**Q. No. 76 to 80 : Read the passage carefully and find out the options.**

In any awkward situation or a misadventure, a man with a sense of humour can take a detached view of it, and laugh at the absurdity. Such a laughter, such a sense of humour is a great relief. The English have it in a marked degree, whereas the French and the Germans lack it.

Whenever one wonders why this sense of humour is required, one should consider the reactions of a person with a sense of humour, and those who have no humour, and is either too serious or too sentimental. A man with a sense of humour looks at the victims of laughter in a sympathetic, loving light, and even if the laugh is turned against himself, he takes it with detachment, in a sportsman-like spirit.

A sense of humour means a sense of proportion. A wise man has a sense of proportion. He is not carried away by an exaggerated or a one-sided view, however exalted it may be. This sense of proportion may be called commonsense. A humorist, in proportion as he is great, is a wise man, a man of sound commonsense, and his laughter is of the highest type. Comedy of the highest type includes, as its soul, this sense of humour.

The spirit of humour teaches us the important philosophy of acceptance. Instead of vainly and frettingly trying to reform the world - 'mould the sorry state of things' - the humorist accepts the incongruity of the world - the absurdity - and laughs at it, and enjoys it. As the mystic at the highest moment of his trance, is one with the world, accepts it, so the humorist at the best, is satisfied with the world, accepts it, and laughs, and enjoys the very absurdity of it.

This laughter of the highest type has naturally a social value. It opens the eyes of the readers to the incongruity and the absurdity of life around us.

76. Choose the word with the closest meaning to the word underlined in the sentence.
**The spirit of humour teaches us the important philosophy of acceptance.**
(1) to reject (2) to receive
(3) to laugh (4) none of the above

77. A humorist is compared to a mystic because :

(1) He remains detached from others.

(2) He is always in a trance.

(3) He accepts the world as it is.

(4) He tries to change the world.

---

78. Choose the **correct** option as per the passage.

**'to open the eyes' means :**

(1) to blink rapidly (2) to make aware

(3) to make sure (4) to take a quick look

---

79. Complete the sentence given by choosing the **correct** option :

**A sense of humour implies _________.**

(1) one sided viewpoint (2) frettingly try to reform

(3) to avoid laughter (4) to accept incongruities

---

80. Read the passage carefully and find out the options which agree with the sentence given.

**'A person with a sense of humour is _________'.**

(1) judicious, didactic and demanding change

(2) too serious and sentimental

(3) sympathetic, detached and loving even if laughed at

(4) happy with a sense of superiority

---

81. 78 भागांची रामायण ही मालिका दूरदर्शनवर सर्वप्रथम कधी प्रसारित झाली ?

(1) 1985 - 86 (2) 1989 - 90 (3) 1982 - 83 (4) 1987 - 88

The seventyeight episodes of the television series Ramayan were first telecast on Doordarshan in _________ .

(1) 1985 - 86 (2) 1989 - 90 (3) 1982 - 83 (4) 1987 - 88

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

82. सी.डी. देशमुखांबद्दलची पुढील विधाने सत्य की असत्य ते ओळखा.

(a) हे केंद्रीय अर्थमंत्री होते.

(b) हे संसदेत कुलाबा मतदारसंघातून गेले होते.

(c) यांनी मुंबईचा समावेश महाराष्ट्रात न झाल्याच्या निषेधार्थ राजीनामा दिला.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b) आणि (c) सर्व सत्य आहेत.

(2) (a), (b) आणि (c) सत्य नाही.

(3) (a) आणि (b) सत्य आहेत, (c) सत्य नाही.

(4) (a) आणि (c) सत्य आहेत, (b) सत्य नाही.

State whether the following statements about C.D. Deshmukh are true or false ?

(a) He was the Union Finance Minister.

(b) He was the Member of Parliament from Colaba.

(c) He resigned in protest against Mumbai not being allotted to Maharashtra.

**Answer options :**

(1) (a), (b) and (c) all are true.

(2) (a), (b) and (c) all are not true.

(3) (a) and (b) are true, (c) is not true.

(4) (a) and (c) are true, (b) is not true.

---

83. 1954 साली जेव्हा राज्यसभा सदस्य लीलावती मुन्शी यांनी 'सिनेमामुळे तरुण बिघडतात' असा दावा केला, तेव्हा ________ अभिनेता व राज्यसभा सदस्याने, 'ऊन आणि सावली हे सोबतच असतात' असे प्रत्युत्तर दिले.

(1) राज कपूर (2) पृथ्वीराज कपूर

(3) दिलीप कुमार (4) देव आनंद

When the Rajya Sabha member Lilavati Munshi argued in 1954 that 'Cinema might badly influence the youth', ________ actor and Rajya Sabha member insisted that, 'Sunshine and Shadow went hand in hand.'

(1) Raj Kapoor (2) Prithviraj Kapoor

(3) Dileep Kumar (4) Dev Anand

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

84. _________ च्या शहरी भागातील साम्यवादी आणि समाजवादी स्त्रियांनी भाववाढी विरुद्ध चळवळ 1973 - 75 मध्ये सुरू केली होती.

(1) महाराष्ट्र (2) केरळ

(3) मद्रास (4) मध्य प्रदेश

The anti-price rise movement of 1973 - 75, was organized by communist and socialist women in the urban areas of _________ .

(1) Maharashtra (2) Kerala

(3) Madras (4) Madhya Pradesh

---

85. _________ जे अस्पृश्यते विरुद्धचे योध्दे होते, ज्यांनी 'राम राज्य' हा चित्रपट अर्धवट पाहिला होता; त्यांना 'अछूत कन्या' चित्रपटाचे निर्माते त्यांचा चित्रपट पाहण्यास आणू शकले नाहीत.

(1) डॉ. आंबेडकर (2) महात्मा गांधी

(3) विठ्ठल रामजी शिंदे (4) जयप्रकाश नारायण

The producer of 'Achhut Kanya' was unable to get _________ the Crusader against untouchability and who also had seen 'Ram Rajya' film only half way, to see his film.

(1) Dr. Ambedkar (2) Mahatma Gandhi

(3) Vitthal Ramji Shinde (4) Jayprakash Narayan

---

86. संस्थानिकांशी त्यांच्या तनख्यांबाबत बोलणी करून त्यानंतर संसदेत संस्थानिकांचे विशेष हक्क रद्द करणारे विधेयक _________ या गृहमंत्र्यांनी मांडले.

(1) वल्लभभाई पटेल (2) यशवंतराव चव्हाण

(3) गुलझारीलाल नंदा (4) लाल बहादूर शास्त्री

_________, the Home Minister conducted negotiations with the Princes regarding their privy purses and introduced the bill that annulled the privileges of the princes.

(1) Vallabhbhai Patel (2) Yashwantrao Chavan

(3) Gulzarilal Nanda (4) Lal Bahadur Shastri

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

87. मुफ्ती महंमद सयीद, भारताचे ________ होते, त्यांची मुलगी डॉ. रुबाया सयीद हीचे जम्मू-काश्मीर मुक्ती संघटनेने श्रीनगर येथे अपहरण केले.

(1) अर्थ मंत्री (2) संरक्षण मंत्री

(3) विदेश मंत्री (4) गृह मंत्री

Dr. Rubaiya Sayeed who was kidnapped at Shrinagar by Jammu and Kashmir Liberation Front was the daughter of Mufti Mohammed Sayeed, who was the ________ of India.

(1) Finance Minister (2) Defence Minister

(3) Foreign Minister (4) Home Minister

88. ऑक्टोबर 1988 मध्ये ज्याचे जुन्या जनता पक्षात विलीनीकरण होवून जनता दल अस्तित्वात आले तो 'जन मोर्चा' कोणी स्थापन केला होता ?

(1) एन्.टी. रामा राव (2) व्ही.पी. सिंग (3) मोरारजी देसाई (4) चरण सिंग

Who had formed the 'Jan Morcha', which was merged in October 1988, with the Old Janata Party to form the Janata Dal ?

(1) N.T. Rama Rao (2) V.P. Singh (3) Morarji Desai (4) Charan Singh

89. विजोड गोष्ट ओळखा :

(1) अप्सरा (2) आर्यभट्ट (3) ध्रुव (4) कामिनी

Pick out the odd thing from the following :

(1) Apsara (2) Aryabhatta (3) Dhruva (4) Kamini

90. सन 1955 च्या बांडुंग परिषदेमध्ये खालीलपैकी कोणाचा सहभाग होता ?

(1) फ्रँकलीन रूझवेल्ट, लाल बहादूर शास्त्री, नासेर

(2) पंडीत जवाहरलाल नेहरू, नासेर, चौ-एन-लाय

(3) विन्स्टन चर्चिल, डॉ. राजेंद्र प्रसाद, बॅरिस्टर जीना

(4) क्लेमेंट ॲटली, माओ त्से तुंग, नेल्सन मंडेला

Who from the following had participated in the Bandung Conference in 1955 ?

(1) Franklin Roosevelt, Lal Bahadur Shastri, Nasser

(2) Pandit Jawaharlal Nehru, Nasser, Chou-En-Lai

(3) Winston Churchill, Dr. Rajendra Prasad, Barrister Jinnah

(4) Clement Attlee, Mao Tse Tung, Nelson Mandela

91. महाराष्ट्राचे नवे औद्योगिक धोरण ________ रोजी जाहीर करण्यात आले.

(1) 1 नोव्हेंबर, 2006 (2) 1 नोव्हेंबर, 2007

(3) 1 नोव्हेंबर, 2008 (4) 1 नोव्हेंबर, 2005

The new Industrial Policy of Maharashtra was proclaimed on ________ .

(1) 1 November, 2006 (2) 1 November, 2007

(3) 1 November, 2008 (4) 1 November, 2005

---

92. महाराष्ट्राच्या संदर्भात खालील विधानांवर विचार करा आणि कोणती विधाने **बरोबर** आहेत ते सांगा ?

(a) मुंबई उपनगर जिल्हा सर्वात कमी क्षेत्रफळाचा जिल्हा आहे.

(b) अहमदनगर सर्वात जास्त क्षेत्रफळाचा जिल्हा आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) बरोबर (b) चूक (2) (a) चूक (b) बरोबर

(3) दोन्ही बरोबर (4) दोन्ही चूक

Consider the following statements and answer which is **correct** regarding Maharashtra State ?

(a) Mumbai suburban district is smallest district in terms of area.

(b) Ahmednagar is largest district in terms of area.

**Answer options :**

(1) (a) correct (b) wrong (2) (a) wrong (b) correct

(3) Both correct (4) Both wrong

---

93. पृथ्वीला स्वत:भोवती एक फेरी पूर्ण करण्यास किती कालावधी लागतो ?

(1) 23 तास 56 मिनिटे 4.09 सेकंद (2) 23 तास 55 मिनिटे 59.09 सेकंद

(3) 23 तास 55 मिनिटे 49.09 सेकंद (4) 23 तास 56 मिनिटे 0.09 सेकंद

How much time is required by the earth to complete one rotation around itself ?

(1) 23 hours 56 minutes 4.09 seconds (2) 23 hours 55 minutes 59.09 seconds

(3) 23 hours 55 minutes 49.09 seconds (4) 23 hours 56 minutes 0.09 seconds

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

94. कोणत्या नद्याच्या संयुक्त प्रवाहास प्राणहिता नदी म्हणतात ?

(a) वर्धा, वैनगंगा, पैनगंगा (b) अंजना, गिरजा, मांजरा

(c) प्रवरा, मुळा, शिवना (d) पूर्णा, दुधना, दारणा

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) फक्त (2) (b) आणि (d) (3) (c) आणि (a) (4) फक्त (d)

Which confluence of the river is called the Pranhita river ?

(a) Wardha, Vainganga, Painganga (b) Anjana, Girja, Manjara

(c) Pravara, Mula, Shivana (d) Poorna, Dudhana, Darana

**Answer options :**

(1) Only (a) (2) (b) and (d) (3) (c) and (a) (4) Only (d)

---

95. खालीलपैकी वृष्टीची रूपे सांगा.

(a) पाऊस (b) रिमझिम पाऊस (c) हिमवृष्टी (d) ढग

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) (2) (a) आणि (d) फक्त

(3) (a), (b) आणि (c) (4) (c) आणि (d)

State the forms of precipitation from the following.

(a) Rainfall (b) Drizzle (c) Snowfall (d) Cloud

**Answer options :**

(1) Only (a) (2) (a) and (d) only

(3) (a), (b) and (c) (4) (c) and (d)

---

96. महाराष्ट्राच्या पूर्वेस तेलंगणा राज्याबरोबर खालीलपैकी कोणत्या एका जिल्ह्याची सरहद्द लागत नाही ?

(1) चंद्रपूर (2) यवतमाळ (3) गोंदिया (4) नांदेड

Among the following districts of Maharashtra which district does not touch the boundary of Telangana State in East ?

(1) Chandrapur (2) Yavatmal (3) Gondia (4) Nanded

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

97. खालील विधाने पहा.

(a) प्रत्येक रेखावृत्ताची लांबी 20,000 कि.मी. आहे.

(b) विषुववृत्तावर दोन रेखावृत्तामधील अंतर 101.04 कि.मी. आहे.

(c) भारतीय प्रमाणवेळ जागतिक प्रमाणवेळेच्या 5 तास 30 मिनिटांनी मागे आहे.

वरीलपैकी कोणती/कोणते विधान/विधाने **बरोबर** आहे/आहेत ?

(1) फक्त विधान (a) (2) फक्त विधान (b)

(3) विधान (a) आणि (b) (4) विधान (b) आणि (c)

Observe the following statements.

(a) The length of every longitude is 20,000 km.

(b) The distance between two longitudes on equator is 101.04 km.

(c) The Indian Standard Time is 5 hours 30 minutes behind the World Standard Time.

Which of the above statement/statements is/are **correct** ?

(1) Only Statement (a) (2) Only Statement (b)

(3) Statement (a) and (b) (4) Statement (b) and (c)

---

98. सह्याद्री पर्वताच्या पूर्वेस विशाल असा पठारी प्रदेश पसरलेला आहे त्यास ________ पठारी प्रदेश असे म्हटले जाते.

(a) महाराष्ट्र पठार किंवा दख्खन पठार

(b) बुलढाणा पठार आणि औंध पठार

(c) सासवड आणि खानापूर पठार

(d) अग्निजन्य पठार

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) फक्त (2) (b) आणि (c) (3) (c) आणि (d) (4) (d) फक्त

The large plateau spread to the east of the Sahyadri Mountain ranges is called :

(a) Plateau of Maharashtra or Deccan Plateau.

(b) Buldhana and Aundh Plateau

(c) Saswad and Khanapur Plateau

(d) Igneous Plateau

**Answer options :**

(1) (a) only (2) (b) and (c) (3) (c) and (d) (4) (d) only

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

99. महाराष्ट्राच्या 2011 सालच्या जनगणनेप्रमाणे खालील जिल्ह्याचा उच्च लिंग-गुणोत्तरानुसार उतरता क्रम लावा.

(1) गोंदिया, सिंधुदुर्ग, रत्नागिरी (2) गोंदिया, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

(3) सिंधुदुर्ग, रत्नागिरी, गोंदिया (4) रत्नागिरी, सिंधुदुर्ग, गोंदिया

According to 2011 census arrange the following districts of Maharashtra in descending order in terms of high sex ratio.

(1) Gondia, Sindhudurg, Ratnagiri (2) Gondia, Ratnagiri, Sindhudurg

(3) Sindhudurg, Ratnagiri, Gondia (4) Ratnagiri, Sindhudurg, Gondia

---

100. महाराष्ट्रातील खालील सागरी किल्ले दक्षिणेकडून-उत्तरेकडे क्रमाने लावा.

(1) विजयदुर्ग, जंजिरा, सिंधुदुर्ग (2) जंजिरा, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग

(3) सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, जंजिरा (4) सिंधुदुर्ग, जंजिरा, विजयदुर्ग

Arrange the following Sea Forts of Maharashtra from South to North.

(1) Vijaydurg, Janjira, Sindhudurg (2) Janjira, Sindhudurg, Vijaydurg

(3) Sindhudurg, Vijaydurg, Janjira (4) Sindhudurg, Janjira, Vijaydurg

---

101. महाराष्ट्रातील ग्रामपंचायतीबाबत खालील विधाने विचारात घ्या.

(a) मागासवर्गीय उमेदवार सर्वसाधारण (बिगर राखीव) असलेल्या सरपंचपदी निवडून येण्यास पात्र असतो.

(b) सर्वसाधारण (बिगर राखीव) जागेवर निवडून आलेली मागासवर्गीय व्यक्ती मागासवर्गीयासाठी राखीव असलेल्या सरपंचपदी निवडून येण्यास पात्र असतो.

**पर्यायी उत्तरे :**

(1) विधान (a) बरोबर (2) विधान (b) बरोबर

(3) दोन्हीही विधाने बरोबर (4) दोन्हीही विधाने चूकीची

Consider the following statements about Gram-Panchayats in Maharashtra.

(a) A backward class candidate is eligible to elect as Sarpanch which is unreserved (open).

(b) A backward class person elected from General (open) seat is eligible to elect as Sarpanch which is reserved for backward class.

**Answer options :**

(1) Statement (a) is correct (2) Statement (b) is correct

(3) Both the statements are correct (4) Both the statements are false

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

102. संविधान सभेने भारतीय राष्ट्रीय ध्वजाची रचना ________ रोजी स्विकारली.

(1) 9 डिसेंबर, 1946, तिच्या पहिल्या बैठकीत

(2) 22 जानेवारी, 1947 जेंव्हा सुप्रसिद्ध उद्दिष्टांचा ठराव स्विकारला गेला

(3) 22 जुलै, 1947

(4) 14 ऑगस्ट, 1947

The design of the National Flag of India was adopted by the Constituent Assembly on ________ .

(1) 9th December, 1946, at its first meeting

(2) 22nd January, 1947, when it adopted the famous objective resolution

(3) 22nd July, 1947

(4) 14th August, 1947

---

103. खालीलपैकी कोणते विधान **चुकीचे** आहे ?

(a) राज्यपाल हा राज्याचा घटनात्मक प्रमुख आहे.

(b) मुख्यमंत्री हा राज्य शासनाचा प्रमुख आहे.

(c) सचिव हा राज्याचा प्रशासकीय प्रमुख आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) (2) (b) (3) (c) (4) वरीलपैकी कोणतेही नाही

Which one of the following statements is **false** ?

(a) Governor is the constitutional head of the state.

(b) Chief Minister is the head of the State Government.

(c) Secretary is the administrative head of the state.

**Answer options :**

(1) (a) (2) (b) (3) (c) (4) None of the above

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

104. जोड्या लावा - (मूलभूत अधिकार).

| | 'अ' | | 'ब' |
|---|---|---|---|
| (a) | अनुच्छेद 14 | (i) | अस्पृश्यतेची समाप्ती |
| (b) | अनुच्छेद 16 | (ii) | संधीची समानता |
| (c) | अनुच्छेद 17 | (iii) | पदव्यांची समाप्ती |
| (d) | अनुच्छेद 18 | (iv) | कायद्यासमोर समानता |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (2) | (ii) | (iv) | (iii) | (i) |
| (3) | (iv) | (ii) | (iii) | (i) |
| (4) | (iv) | (ii) | (i) | (iii) |

Match the pairs - (Fundamental Rights).

| | 'A' | | 'B' |
|---|---|---|---|
| (a) | Article 14 | (i) | Abolition of Untouchability |
| (b) | Article 16 | (ii) | Equality of Opportunity |
| (c) | Article 17 | (iii) | Abolition of Titles |
| (d) | Article 18 | (iv) | Equality before Law |

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (2) | (ii) | (iv) | (iii) | (i) |
| (3) | (iv) | (ii) | (iii) | (i) |
| (4) | (iv) | (ii) | (i) | (iii) |

105. खालील विधाने विचारात घ्या.

(a) जर राज्यपालाकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार अथवा अन्य मार्गाने राष्ट्रपतीचे समाधान झाले की राज्यशासन राज्यघटनेनुसार चालत नाही तर ते राष्ट्रपती राजवट लागू करू शकतात.

(b) राष्ट्रपतीचे समाधान म्हणजेच केन्द्र सरकारचे समाधान.

(c) राष्ट्रपती राजवट ही प्रत्यक्षात केन्द्र सरकारची राजवट असते.

(d) राज्यघटनेच्या कार्याचे पुनर्विलोकन करणाऱ्या राष्ट्रीय आयोगाने (NCRWC) अनुच्छेद 356 हे वगळण्यात यावे अशी शिफारस केली होती.

**पर्यायी उत्तरे :**

(1) विधाने (a), (b), (c) बरोबर

(2) विधाने (b), (c), (d) बरोबर

(3) विधाने (a) आणि (d) बरोबर

(4) विधाने (a), (b), (c), (d) बरोबर

Consider the following statements.

(a) If on receipt of a report from the Governor or otherwise the President is satisfied that the Government of the state cannot be carried on in accordance with the Constitution he may impose a President's Rule.

(b) The satisfaction of the President means the satisfaction of the Union Government.

(c) President's Rule is actually rule by the Union Government.

(d) The National Commission to Review the working of the Constitution (NCRWC) has recommended that the Article 356 should be deleted.

**Answer options :**

(1) Statements (a), (b), (c) are correct

(2) Statements (b), (c), (d) are correct

(3) Statements (a) and (d) are correct

(4) Statements (a), (b), (c), (d) are correct

106. विधान परिषदेबाबत खालीलपैकी कोणते विधान/विधाने **बरोबर नाही/नाहीत** ?

(a) सर्वसाधारणपणे म्हटले जाते की, एकूण सभासद संख्येच्या 5/6 सदस्य हे अप्रत्यक्ष निवडले जातात.

(b) 1/6 सदस्य हे राज्यपालांद्वारा नामनिर्देशित केले जातात.

(c) राज्यपालांच्या नामनिर्देशनाबाबत न्यायालये प्रश्न उपस्थित करू शकतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) (2) (b) (3) (c) (4) (a) आणि (c)

Which of the following statement/statements about the Legislative Council is/are **not correct** ?

(a) Broadly speaking 5/6 of the total number of members are elected indirectly.

(b) 1/6 members are nominated by the Governor.

(c) The courts can question the bonafide of the Governor's nomination.

**Answer options :**

(1) (a) (2) (b) (3) (c) (4) (a) and (c)

---

107. मार्गदर्शक तत्वांच्या प्रकरणातील कोणत्या कलमाने दारुबंदी करण्याचे निर्देश राज्यांना दिले आहेत ?

(1) कलम 41 (2) कलम 44 (3) कलम 47 (4) कलम 51

Which article in the chapter of Directive Principles directs the States to prohibit consumption of liquor ?

(1) Article 41 (2) Article 44 (3) Article 47 (4) Article 51

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

108. खालील तलाव व जिल्ह्यांच्या योग्य जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | आंदरा | (i) | परभणी |
| (b) | आळंद | (ii) | वाशीम |
| (c) | वारुळ | (iii) | पुणे |
| (d) | पांगरी | (iv) | नांदेड |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| (3) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (4) | (iv) | (ii) | (i) | (iii) |

Match the following lakes with their districts.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Andra | (i) | Parbhani |
| (b) | Aland | (ii) | Washim |
| (c) | Varul | (iii) | Pune |
| (d) | Pangri | (iv) | Nanded |

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| (3) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (4) | (iv) | (ii) | (i) | (iii) |

---

109. खालीलपैकी कोणाचा 'पिळवणूकी विरुद्धच्या हक्कात' समावेश होत नाही ?

(1) मानवी व्यापारास प्रतिबंध
(2) अस्पृश्यता निवारण
(3) वेठबिगारीस प्रतिबंध
(4) मुलांना धोक्याच्या ठिकाणी कामास प्रतिबंध

Which of the following does not include in the 'Right against Exploitation' ?

(1) Prohibition of traffic in human beings
(2) Abolition of untouchability
(3) Prohibition of beggary
(4) Prohibition of employment of children in hazardous jobs

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

110. 9 डिसेंबर 1946 रोजी नवी दिल्लीमध्ये कॉन्स्टीट्युशन हॉल मध्ये घटना समितीची पहिली बैठक भरली होती. त्या हॉलला आता ________ म्हणतात.

(1) संसदीय ग्यानपीठ (2) पार्लमेंट हाऊस चा सेंट्रल हॉल

(3) पार्लमेंट हाऊस अनेक्स (4) लोकसभा चेंबर

The Constitution hall where the first meeting of the Constituent Assembly was held on 9th December, 1946, in New Delhi is now known as the ________.

(1) Sansadiya Gyanpeeth (2) Central Hall of the Parliament House

(3) Parliament House Annexe (4) Lok Sabha Chamber

---

111. राष्ट्रपती ________ सोबत विचार विनिमय केल्यानंतर न्यायाधिशांची बदली एका उच्च न्यायालयातुन दुसऱ्या उच्च न्यायालयात करतात.

(1) पंतप्रधान (2) उपराष्ट्रपती

(3) विधि मंत्री (4) वरीलपैकी एकही नाही

Judges may be transferred from one High Court to another by the President after consulting ________.

(1) Prime Minister (2) Vice-President

(3) Law Minister (4) None of the above

---

112. 'विधानसभा' बाबत खालील विधाने विचारात घ्या.

(a) महाराष्ट्रात अनुसूचित जमातीसाठी 29 जागा या राखीव आहेत.

(b) अरूणाचल प्रदेशात 60 पैकी 59 जागा या अनुसूचित जमातीसाठी राखीव आहेत.

(c) नागालँडमध्ये सर्व जागा या अनुसूचित जमातीसाठी राखीव आहेत.

(d) उत्तर प्रदेशात अनुसूचित जमातीसाठी एकही जागा राखीव नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) विधाने (a), (b) बरोबर (2) विधाने (b), (c) बरोबर

(3) विधाने (a), (d) बरोबर (4) विधाने (b), (d) बरोबर

Consider the following statements about the 'Legislative Assembly'.

(a) In Maharashtra, 29 seats are reserved for Scheduled Tribes.

(b) In Arunachal Pradesh, out of 60 seats, 59 are reserved for Scheduled Tribes.

(c) In Nagaland, all seats are reserved for Scheduled Tribes.

(d) In Uttar Pradesh, not a single seat is reserved for Scheduled Tribes.

**Answer options :**

(1) Statements (a), (b) are correct (2) Statements (b), (c) are correct

(3) Statements (a), (d) are correct (4) Statements (b), (d) are correct

---

113. खालीलपैकी कोणत्या व्यक्ती त्यांच्या संबंधित राज्याचे मुख्यमंत्रीपद भूषविल्यानंतर पंतप्रधान बनले होते ?

(a) मोरारजी देसाई (b) चरण सिंग

(c) व्ही.पी. सिंग (d) पी.व्ही. नरसिंहराव

(e) एच.डी. देवेगौडा

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (c), (d) (2) (a), (b), (e)

(3) (a), (b), (c), (e) (4) (a), (b), (c), (d), (e)

Who among the following persons became Prime Ministers after being Chief Minister of their respective states ?

(a) Morarji Desai (b) Charan Singh

(c) V.P. Singh (d) P.V. Narasimha Rao

(e) H.D. Deve Gowda

**Answer options :**

(1) (a), (c), (d) (2) (a), (b), (e)

(3) (a), (b), (c), (e) (4) (a), (b), (c), (d), (e)

---

114. खालीलपैकी कोणते विधाने **बरोबर नाही** ?

(1) राज्यपाल पदाचा ठरलेला कार्यकाल पाच वर्षे आहे परंतु ते राष्ट्रपतीच्या मर्जीवर पद धारण करतात.

(2) 'राष्ट्रपतीची मर्जी' बाबत न्यायालयात दाद मागता येत नाही.

(3) राज्यपालांना पदाची सुरक्षितता नाही, त्यांना राष्ट्रपती पदावरुन कोणत्याही क्षणी हटवू शकतात.

(4) राज्यघटनेने कांही कारणे सांगितली आहेत ज्यावरून राष्ट्रपती राज्यपालांना पदावरुन हटवू शकतात.

Which of the following statements is **not correct** ?

(1) The prescribed term of office for a Governor is five years but he holds office at the pleasure of the President.

(2) The pleasure of the President is not challengeable before any court.

(3) The Governor has no security of tenure, he may be removed by the President at any time.

(4) The Constitution has laid down some grounds upon which a Governor may be removed by the President.

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**115.** खालीलपैकी कोणते विधान **बरोबर नाही** ?

(1) मूलभूत कर्तव्यांची संख्या आता अकरा आहे.

(2) मूलभूत कर्तव्यांचा समावेश 1976 च्या 42 व्या घटनादुरुस्ती अधिनियमाद्वारे करण्यात आला.

(3) मूलभूत कर्तव्ये अनुच्छेद 51 मध्ये समाविष्ट आहेत.

(4) राज्यघटनेत यापैकी कोणत्याही कर्तव्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी तरतूद नाही.

Which one of the following statements is **not correct** ?

(1) The Fundamental Duties are now eleven in number.

(2) The Fundamental Duties has been inserted by the 42$^{nd}$ Constitutional Amendment Act, 1976.

(3) The Fundamental Duties are incorporated in Article 51.

(4) There is no provision in the Constitution for direct enforcement of any of these Duties.

---

**116.** खालीलपैकी कोणत्या पंचवार्षिक योजनेचा उद्देश सर्वसमावेशक वृद्धी साधणे हा राहिला ?

(1) नववी पंचवार्षिक योजना (2) दहावी पंचवार्षिक योजना

(3) अकरावी पंचवार्षिक योजना (4) बारावी पंचवार्षिक योजना

Which Five Year Plan aims at inclusive growth ?

